ePaper
वर्ष - 7 । अंक -17 UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज (TM)
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!
www.mahaenews.com । शुक्रवार, दि. 12 मे 2023 पिंपरी-चिंचवड आवृत्ती mahaenews.com maha_enews Mahaenews

# मी मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत...:राधाकृष्ण विखे-पाटील



## आतील पानांत


- पुण्यासाठी नवी पालिका कधी?
- विदेशी वाहनांची 'क्रेझ' : गेल्या वर्षात ३०९ परदेशी वाहनांची आयात


## किशोर आवारे यांची भरदुपारी चौकात हत्या!

# मावळात मुळशी पॅटर्न!

## तळेगाव नगरपरिषदेसमोर गोळीबार आणि कोयत्याने वार

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

जनसेवा विकास आघाडीचे संस्थापक अध्यक्ष किशोर आवारे यांच्यावर तळेगाव नगरपरिषदेच्या कार्यालयासमोर प्राणघातक हल्ला झाला. या हल्ल्यात आवारे यांचा मृत्यू झालाय. गोळीबार करुन त्यांच्यावर कोयत्याने वार करण्यात आले होते. हल्ला झाल्यानंतर त्यांच्यावर सोमाटणे फाटा येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू होते. पण उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. हल्लेखोरांनी भर दुपारी गजबजाट असलेल्या परिसरात हल्ला केल्याने सगळ्यांची एकच धावपळ उडाली.तळेगाव नगरपरिषदेच्या कार्यालयासमोर भरदुपारी अज्ञात हल्लेखोरांनी आवारे यांच्यावर गोळीबार व कोयत्याने वार करून जीवघेणा हल्ला केला. दरम्यान, त्यांना तातडीने रुग्णालयात हलविण्यात आले. पण या हल्ल्यात त्यांचा मृत्यू झाला आहे. शेकडो लोक जमल्याने रुग्णालय परिसरात तणाव निर्माण झाला आहे.



मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, किशोर आवारे हे तळेगाव दाभाडे नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांची भेट घेऊन खाली आले होते. त्यावेळी दबा धरून बसलेल्या चार जणांनी त्यांच्यावर प्राणघातक हल्ला केला. त्यापैकी दोघाजणांनी गोळीबार केला. तर दोन जणांनी कोयत्याने वार केले. हल्ला केल्यानंतर हल्लेखोर त्याच ठिकाणी काही वेळ थांबून होते. आवारे हे रक्ताच्या थारोळ्यात पडल्यानंतरही हल्लेखोर काहीवेळ तिथेच थांबून होते. जखमी अवस्थेतील आवारे यांना सोमाटणे फाटा येथील खासगी रुग्णालयात दाखल केले. त्यांच्यावर उपचार सुरू होते, पण काहीच वेळात त्यांनी उपचारांना प्रतिसाद देणं बंद केलं. राजकीय वादातून हा हल्ला

### घरातूनच राजकीय वारसा मिळाला

» तसेच सोमाटणे टोलनाका बंद व्हावा म्हणून त्यांनी उपोषण आणि आंदोलने देखील केली होती. त्या आंदोलनाचा राज्य सरकारने दखल घेत टोलनाका बंद करण्याचे आश्वासन देखील आवारे यांना शासनाने दिले होते. मात्र त्या अगोदरच ही घटना घडल्याने एकच खळबळ उडाली आहे. त्यांना राजकीय वारसा त्यांच्या घरातूनच मिळाला होता. त्यांची आई देखील नगरसेविका होती. भाऊ सुद्धा नगरसेवक होता. आईने नगराध्यक्ष पद देखील भूषवले आहे. किशोर आवारे यांना नुकताच पुण्यातील महाराष्ट्र साहित्य कला प्रसारिणी सभा यांच्या वतीने डॉ.निर्मलकुमार फडकुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त देण्यात येणारा समाजभूषण पुरस्कार जाहीर झाला होता.

### राजकारणात जम बसवत होते, पण...

» जनसेवा विकास समितीच्या माध्यमातून आवारे यांनी तळेगावात विविध सामाजिक उपक्रमांद्वारे समाजाशी दांडगा जनसंपर्क बनवला होता. सहा वर्षांपूर्वी झालेल्या तळेगाव नगरपरिषद निवडणुकीत जनसेवा विकास समितीचे नगरसेवक निवडून आणून किशोर आवारे यांनी राजकारणात आपले स्थान बळकट केले होते.

### आवारे यांचं समाजकार्यात मोठं काम होतं...

» किशोर आवारे यांना मानणारा तळेगावात मोठा वर्ग होता. सामाजिक कार्याची त्यांना पहिल्यापासूनच आवड होती. आपल्या सहकाऱ्यांसमवेत समाजकार्यात त्यांनी वाहून घेतलं होतं. त्याचीच पोचपावची म्हणून पुण्यातील महाराष्ट्र साहित्य कला प्रसारिणी सभा यांच्या वतीने डॉ.निर्मलकुमार फडकुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त देण्यात येणारा समाजभूषण पुरस्कार आवारे यांना जाहीर झाला होता. कोरोना साथरोग काळात तसेच कोल्हापूर आणि चिपळूणमधील महापुराच्या काळात त्यांनी स्वखर्चातून भरीव मदतकार्य केले होते.

### सात नगरसेवक निवडून आणले

» सामाजिक कार्यात किशोर आवारे यांचा मोठा वाटा होता. समाजात त्यांचा दांडगा जनसंपर्क होता. सहा वर्षांपूर्वी झालेल्या तळेगाव नगरपरिषद निवडणुकीत जनसेवा विकास समितीचे नगरसेवक निवडून आणून किशोर आवारे यांनी राजकारणात आपले स्थान बळकट केले होते. विद्यमान आमदार सुनील अण्णा शेळके आणि किशोर आवारे हे कट्टर विरोधक असल्याची माहिती देखील समोर आली आहे. तळेगाव आणि मावळच्या राजकारणात आवारे यांनी हळूहळू जम बसवायला सुरुवात केली होती. सध्या तळेगाव नगरपालिकेत त्यांचे सात ते आठ नगरसेवक आहेत. लक्ष्मण जगताप यांचा जवळचा कार्यकर्ता म्हणून आवारे यांची ओळख होती.

### सोमाटणे टोलनाक्याचा काही संबंध?

» चार अज्ञात हल्लेखोरांनी हा हल्ला केल्याचे सांगितले जात आहे. हल्लेखोराचा शोध पिंपरी चिंचवड पोलीस घेत आहेत. गेल्या काही दिवसांपासून सोमाटणे टोलनाका टोलमुक्त व्हावा यासाठी किशोर आवारे हे सोमाटणे टोलनाका हटाव कृती समितीच्या माध्यमातून लढा देत होते. त्याचा संदर्भ या हल्ल्याशी आहे का? हे तपासले जाणार आहे.

# पुणे : स्ट्रक्चरल ऑडिटवरून मेट्रो आणि 'सीओईपी'चे 'तू तू–मैं मैं' सुरूच!

## सीओईपीकडून अंतिम अहवाल लवकरच महामेट्रोला मिळण्याची शक्यता

। पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मेट्रो स्थानकांचे संरचनात्मक लेखापरीक्षण (स्ट्रक्चरल ऑडिट) सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाकडून सुरू आहे. या स्ट्रक्चरल ऑडिटचा पाहणी अहवाल विद्यापीठाने महामेट्रोकडे सादर केला होता. त्यात काही तांत्रिक मुद्दे उपस्थित करण्यात आले होते. यावर महामेट्रोने चार ते पाच दिवसांपूर्वी विद्यापीठाला उत्तर दिले आहे. यामुळे आता लवकरच सीओईपीकडून अंतिम अहवाल महामेट्रोला मिळण्याची शक्यता आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.**



पुणे मेट्रो स्थानकांच्या उभारणीत आढळलेल्या त्रुटी पुण्यातील काही ज्येष्ठ अभियंत्यांनी समोर आणल्या होत्या. मेट्रो स्थानकांच्या सुरक्षिततेबाबत दाखल जनहित याचिकेवर उच्च न्यायालयात १७ एप्रिलला सुनावणी झाली. त्या वेळी सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठाने पुन्हा स्ट्रक्चरल ऑडिट करून सात दिवसांत अहवाल सादर करण्यात येईल, असे न्यायालयाला सांगितले होते. यानुसार, विद्यापीठाकडून मेट्रोच्या वनाज ते गरवारे महाविद्यालय या मार्गावरील स्थानकांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले.

विद्यापीठातील प्राध्यापक बी.जी. बिराजदार यांच्या नेतृत्वाखाली हे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले. यात काही प्राध्यापक आणि संशोधक विद्यार्थ्यांचा समावेश होता. बिराजदार यांनी मेट्रोला स्ट्रक्चरल ऑडिटचा पाहणी अहवाल सादर केला होता. या अहवालात मेट्रो स्थानकांबाबत काही तांत्रिक मुद्दे उपस्थित करण्यात आले होते. त्याला महामेट्रोकडून चार ते पाच दिवसांपूर्वी उत्तर देण्यात आले आहे. आता बिराजदार यांचे पथक पुन्हा स्थानकांची पाहणी करणार आहे.

यानंतर ते अंतिम अहवाल महामेट्रोला सादर करतील, अशी माहिती महामेट्रोतील सूत्रांनी दिली.

### फुगेवाडी ते जिल्हा न्यायालय मार्गाची तपासणी

**फुगेवाडी ते जिल्हा न्यायालय या मेट्रो मार्गाची तपासणी मेट्रो रेल्वे सुरक्षा आयुक्तांकडून करण्यात आली आहे. याचबरोबर गरवारे महाविद्यालय ते रुबी हॉल मार्गाची तपासणी त्यांच्याकडून लवकरच होईल. या मार्गाचे तपासणी अहवाल मिळाल्यानंतर राज्य सरकारला महामेट्रोकडून पत्र पाठवले जाईल. त्यानंतर सरकार या मार्गावरील सेवा सुरू करण्याचा निर्णय घेईल, अशी माहिती महामेट्रोचे जनसंपर्क अधिकारी हेमंत सोनावणे यांनी दिली.**

### सही, शिक्क्याविना संयुक्त निवेदन

**मेट्रो स्थानकांच्या स्ट्रक्चरल ऑडिटवरून गोंधळ सुरू आहे. हा गोंधळ मिटवण्यासाठी महामेट्रो आणि सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ यांनी संयुक्त निवेदन काढले. परंतु, या संयुक्त निवेदनावर दोन्हींच्या अधिकारी व्यक्तींची सही अथवा शिक्का नाही. केवळ पदाचा उल्लेख असून, त्यावर नावाचाही उल्लेख नाही. विद्यापीठातील प्राध्यापक बी.जी. बिराजदार यांच्या नेतृत्वाखाली हे ऑडिट करण्यात आले. यात काही प्राध्यापक आणि संशोधक विद्यार्थ्यांचा समावेश होता. बिराजदार यांनी मेट्रोला स्ट्रक्चरल ऑडिटचा अंतिम अहवाल दिल्याचे ३ मे रोजी सांगितले होते. त्या वेळी महामेट्रोने हा अहवाल मिळाला नसल्याचा दावा केला होता. दरम्यान, बिराजदार यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी प्रतिसाद दिला नाही.**

# पुण्यात पोटनिवडणुकीचे वाजणार बिगुल?

## निवडणूक आयोगाने माहिती मागविल्याने चर्चेला उधाण

।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

पुणे लोकसभा मतदारसंघाची जागा रिक्त झाल्याने जिल्हा निवडणूक आयोगाने पोटनिवडणुकीची तयारी सुरू केली आहे. त्यासाठी महापालिकेकडूनही आवश्यक माहिती मागविण्यात आली आहे. पोटनिवडणूक जाहीर झाली नसली, तरी ती जाहीर झाल्यास गडबड होऊ नये, यासाठी ही प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.




खासदार गिरीश बापट यांच्या निधनाने पुणे लोकसभा मतदारसंघाची जागा रिक्त झाली आहे. परिणामी येथे पोटनिवडणूक लागण्याची शक्यता गृहीत धरून ही तयारी सुरू करण्यात आली आहे. जिल्हा निवडणूक विभागाने यासाठी, महापालिकेत कार्यरत असलेल्या राजपत्रित अधिकाऱ्यांची माहिती महापालिका प्रशासनाकडून तातडीने मागविली आहे. त्याला उत्तर देताना महापालिकेने १५ राजपत्रित अधिकाऱ्यांची माहिती कळविली आहे. त्यामुळे पुण्याच्या पोटनिवडणुकीचे बिगुल वाजण्याची शक्यता असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

२०१९मध्ये लोकसभा निवडणुकीत पुणे लोकसभा मतदारसंघातून गिरीश बापट हे खासदार म्हणून निवडून गेले होते. मात्र, लोकसभेची मुदत पूर्ण होण्यापूर्वीच २९मार्च २०२३ रोजी त्यांचे निधन झाले. त्यामुळे ही जागा रिक्त आहे. नियमानुसार, लोकसभा मतदारसंघाची जागा रिक्त झाल्यानंतर सहा महिन्यांच्या आत त्या ठिकाणी निवडणूक घेतली जाते. सध्या विद्यमान लोकसभा सभागृहाची मुदत संपण्यास अद्याप वर्षभराचा कालावधी शिल्लक आहे. त्यामुळे या मतदारसंघाची पोटनिवडणूक कधीही जाहीर होण्याची शक्यता असल्याने निवडणूक विभागाने तयारीला सुरुवात केली आहे, अशी माहिती सूत्रांनी दिली.

# रॅगिंगला कंटाळून तरुणाने आयुष्य संपवलं; घटनेनं पुणे हादरलं

। पुणे ।
। महाईन्यूज । प्रतिनिधी।

पुण्यातील डेक्कन परिसरातील मराठवाडा मित्र मंडळ लॉ-कॉलेजमध्ये तिसऱ्या वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याने रॅगिंगला कंटाळून गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. विद्यार्थ्याला आत्महत्या करण्यास प्रवृत्त करणाऱ्यांविरोधात चतुःश्रृंगी पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

राज रावसाहेब गर्जे, असं आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्याचे नाव आहे. राजचे वडील रावसाहेब प्रल्हाद गर्जे यांनी चतुःश्रृंगी पोलीस स्टेशनमध्ये याबाबत फिर्याद दिली आहे. निरूपम जयवंत



जोशी याच्याविरुध्द आत्महत्यास प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. राज आणि निरूपम यांची ओळख होती. निरूपम हा कोणत्यातरी कारणावरून राज यास मानसिक त्रास देत होता. वेळोवेळी होणाऱ्या त्रासाला कंटाळून राजने गळफास घेऊन आत्महत्या केली.

# अबब.. चक्क 7 वर्षे गैरहजर, अखेर बडतर्फ!

## अडीच हजार दिवस सलग तो नोकरीवर नाही, बेजबाबदार शिपायाला गमवावी लागली नोकरी

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**सरकारी नोकरी हल्ली मिळणे मोठे मुश्किल झाले आहे. तर दुसरीकडे ज्यांच्याकडे सरकारी नोकरी आहे, त्यांना त्याची पर्वाच नसल्याचा प्रत्यय पिंपरी महापालिकेत (PCMC) आला आहे. तेथील एक शिपाई चक्क सात वर्षे कुठलेच कारण न देता विनापरवाना कामावर आलाच नाही. त्याची परिणाम म्हणजे आज या कर्मचाऱ्याला सेवेतून काढून टाकण्यात आले.**



गुन्हेगारी वर्तन आणि लाचखोरीबद्दल यावर्षी व या अगोदरची पिंपरी-चिंचवड महापालिकेतील अनेक कर्मचारी हे निलंबित झालेले आहेत. त्यातील लाचखोरीतील पुन्हा कामावरही रुजू झाल्याचे दिसून आले आहे. मात्र, तब्बल दोन हजार २५५ दिवस गैरहजर राहिल्याने या पालिकेचा कर्मचारी प्रथमच बडतर्फ झाला आहे.

सुनील वसंत पाटील असे त्याचे नाव आहे. 'ह' क्षेत्रीय कार्यालयात तो शिपाई होता. पालिका आयुक्त तथा प्रशासक शेखरसिंह यांनी आज त्याला सेवेतून काढल्याचा आदेश जारी केला. त्यापूर्वी त्याला सुधारण्याच्या म्हणजे सेवेत राहण्याच्या अनेक संधी देण्यात आल्या होत्या. पण, ती एकही त्याने घेतली नाही.

एवढेच नाही, तर गैरहजर राहिल्याचे कारणही त्याने अद्यापर्यंत दिलेले नाही. त्याबद्दल खुलासा केला नाही. काढण्यात आलेल्या नोटीसांनाही त्याने केराची टोपली दाखवली. त्यातून त्याला नोकरीची गरज व गांभीर्य नसल्याने आयुक्तांनी कारवाईचे शेवटचे पाऊल उचलले.

### पालिकेच्या पत्रव्यवहाराल प्रतिसाद नाही

**दरम्यान, पाटील हा त्याच्या राहत्या पत्यावर आढळला नाही. त्यामुळे त्याच्याशी पालिकेने केलेला सर्व पत्रव्यवहार परत आला. परिणामी पालिका प्रशासनाने त्याच्या नातेवाईकांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला. पण, त्यालाही यश आले नाही. म्हणून पाटील याला काढून का टाकण्यात येऊ नये, या इशाऱ्याची नोटीस पेपरला देण्यात आली. त्यालाही प्रतिसाद न आल्याने अखेर पालिका प्रशासनाने पोलिसांत (निगडी पोलिस ठाणे) धाव घेतली. तेथे पाटील मिळून येत नसल्याची तक्रार २०२१ ला दिली. तेव्हा त्यांना त्याच्याविरुद्ध विविध प्रकारचे गुन्हे दाखल असल्याचे समजले. तरीही त्यानंतर त्याला सेवेतून काढण्यासाठी त्यांनी दोन वर्षे घेतली.**

---

# किशोर आवारे हत्या प्रकरणी आमदार सुनील शेळके यांच्यासह सात जणांवर गुन्हा दाखल

।पिंपरी । महाईन्यूज ।

**किशोर आवारे यांच्या हत्याप्रकरणी मावळचे राष्ट्रवादीचे आमदार सुनील शेळके यांच्यासह सात जणांच्या विरोधात रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जनसेवा विकास समितीचे संस्थापक अध्यक्ष किशोर आवारे यांची शुक्रवारी (दि. 12) दुपारी तळेगाव दाभाडे नगरपरिषदेसमोर निर्घृणपणे हत्या करण्यात आली.**



### आमदार शेळके 'नॉट रिचेबल'!

**याबाबत आमदार सुनील शेळके व त्यांचे बंधू सुधाकर शेळके यांचे मोबाईल फोन 'नॉट रीचेबल' आहेत. त्यांच्याशी संपर्क होताच त्यांची बाजू प्रसिद्ध करण्यात येईल.**

आमदार सुनील शेळके, सुधाकर शेळके, संदीप गराडे, श्याम निगडकर (रा. तळेगाव दाभाडे) आणि श्याम याचे तीन साथीदार यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी किशोर आवारे यांच्या आई, तळेगाव दाभाडे नगरपरिषदेच्या माजी नगराध्यक्षा सुलोचना आवारे यांनी तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, किशोर आवारे हे जनसेवा विकास समितीच्या माध्यमातून सामाजिक काम करत होते. जनसेवा विकास सेवा आघाडीच्या माध्यमातून ते तळेगाव येथे राजकारणात देखील सक्रीय होते. त्यामुळे त्यांचे राजकीय विरोधक असलेले आमदार सुनील शेळके, सुधाकर शेळके, संदीप गराडे आणि त्यांच्या कार्यकर्ते यांच्यात वाद होत असत.

मागील सहा महिन्यांपासून किशोर आवारे यांनी आमदार शेळके, (TALEGAON) त्यांचे भाऊ सुधाकर शेळके, संदीप गराडे यांच्यापासून आपल्या जीवाला धोका असल्याचे त्यांच्या आईला सांगितले होते. 15 सप्टेंबर 2022 रोजी फिर्यादी यांच्या वाहन चालकाला तो फिर्यादी यांच्यासोबत असल्याने सुधाकर शेळके आणि त्यांच्या साथीदाराने जातीवाचक शिवीगाळ केली होती.

किशोर आवारे हे त्यांचा मित्र संतोष शेळके यांच्यासोबत फिरत असल्याची बाब सुनील शेळके आणि त्यांच्या भावाला आवडत नसे. संतोष शेळके यांना किशोर आवारे सतत मदत करत असत म्हणून सुनील शेळके आवारे यांच्यावर चिडून असे, असे फिर्यादीत म्हटले आहे.

किशोर आवारे यांनी मागील दोन वर्षांपासून स्वतः चा वेगळा गट तयार करून सुनील शेळके यांना राजकीय विरोध केला. चुकीच्या कामाबाबत वेळोवेळी निदर्शने केली. या रागातून तसेच त्यांचे राजकीय वर्चस्व वाढू लागल्याने आमदार शेळके यांच्या वर्चस्वाला धोका निर्माण झाला असल्याचेही फिर्यादीत म्हटले आहे.

---

# चिंचवड महापालिकेशी संबंधित दस्तऐवज अद्ययावत करणार!

## आयुक्तांचे सर्व विभागप्रमुखांना आदेश

।पिंपरी । महाईन्यूज ।

**पिंपरी-चिंचवड महापालिकेशी संबंधित सर्व दस्तऐवज (अभिलेखे) अद्ययावत केले जाणार आहेत. त्यासाठी झीरो पेंडन्सी ॲण्ड डेली डिस्पोजल कार्यपद्धती रबविण्यात येणार आहे. (PCMC) त्याचा आढावा दरमहा घेतला जाणार आहे. त्याबाबतचा आदेश प्रशासक शेखर सिंह यांनी सर्व विभागप्रमुखांना दिला आहे.**



महापालिकेच्या मुख्य कार्यालयात विविध विभाग आहेत. उद्यान, पशुवैद्यकीय, करसंकलन विभागाचे विभागीय कार्यालये, क्षेत्रीय कार्यालये व महापालिका दवाखाने व रुग्णालये वेगवेगळ्या भागात आहेत. या सर्व कार्यालयांतील अभिलेखे अद्ययावत केले जाणार आहेत. त्यासाठी सर्व अभिलेखांचे कायमस्वरूपी स्कॅनिंग व डिजिटायझेशन केले जाणार आहे. त्याबाबत माहिती व तंत्रज्ञान विभागाला सूचना देण्यात आली आहे.(PCMC) मात्र, त्यानंतरी अभिलेखे करण्यासाठी विभागप्रमुखांसह संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून टाळाटाळ केली जात असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे सर्व विभागांच्या कामकाजाचा मासिक आढावा घ्यावा, अभिलेखांचे वर्गीकरण व अद्ययावतीकरण करून उपाययोजना कराव्यात व त्याबाबतचा अहवाल सादर करावा. सर्व विभागप्रमुखांनी आपल्या विभागातील अभिलेखे सहा गठ्ठे पद्धतीने ठेवावेत.(PCMC) त्यांचे अ, ब, क, ड प्रमाणे वर्गीकरण करावे. ते ओळखू येण्यासाठी विविध रुमालांमध्ये बांधून अभिलेख कक्षामध्ये दाखल करावेत, असेही आयुक्त सिंह यांनी आदेशात स्पष्ट केले आहे.

---

# पिंपरीत ऑनलाइन सट्टेबाजी: रॅकेटचा पर्दाफाश, दोघांना अटक

।पिंपरी । महाईन्यूज ।

पिंपरी चिंचवड पोलिसांनी आयपीएलवर बेकायदेशीरपणे ऑनलाइन सट्टेबाजी करणाऱ्या रॅकेटचा पर्दाफाश केला आहे. या प्रकरणी दोन जणांवर गुन्हा दाखल करून त्यांना अटक केली आहे.

सनी प्रेमचंदगुरनानी (वय ३३ वर्षे, रा. साधु वासवानीगार्डन समोर, पिंपरी) आणि सचिन सुदाम हासनदासानी (रा. साई रेसिडेन्सी काळेवाडी) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. या प्रकरणी शिवाजी नामदेव मुंढे यांनी पिंपरी चिंचवड गुन्हे शाखा युनिट २ च्या पोलीसांकडे फिर्याद दिली होती.

इंडियन प्रीमियर लीग (IPL) चे सामने जसजसे रंगत चालले आहे. तसतसे आयपीएल सामन्यांवर सट्टेबाजीची अनेक प्रकरणे पिंपरी आणि पुण्यातून समोर येत आहेत. अशाच एका घटनेत पिंपरी चिंचवड पोलिसांनी ऑनलाइन सट्टेबाजी करणाऱ्या दोघांवर गुन्हा दाखल करून त्यांना अटक करण्यात आले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी सनी प्रेमचंदगुरनानी आणि सचिन हसंदासानी याने T20WORLDEXCHANGE.COM या वेबसाईटवर MAY3210 या आयडीचा वापर करुन ऑनलाइन सट्टा लावला होता.

# हेच का ते मोदींचे बेटी बचाव अभियान ?




गेल्या २३ एप्रिलपासून राजधानी दिल्लीत जंतर मंतर वर महिला कुस्तीवीरांनी आपल्यावरील लैगिक अत्याचाराचा जाब आणि न्याय मागण्यासाठी आंदोलनाचा दुसरा टप्पा सुरु केला आहे. दुसऱ्या टप्प्यात भारतीय कुस्ती महासंघाचे अध्यक्ष खा.ब्रजभूषण सिंग यांच्या विरोधात दोन गुन्हे दाखल झाले आहेत. या दरम्यान आंदोलन करणाऱ्या खेळाडूंना सरकारप्रणीत दमनाला सामोरे जावे लागत आहे. दुर्दैव हे आहे की ज्यांच्या नाकाखाली हे सगळे घडत आहे त्या केंद्र सरकार आणि प्रधानमंत्री मोदी याना अजूनही त्याची दखल घ्यावीशी वाटत नाही. केंद्र सरकार म्हणजेच पर्यायाने प्रधानमंत्री मोदी एका बाजूला देशात बेटी बचाव असे अभियान चालवीत असताना देशाचा गौरव असणारी बेटी त्यांच्यात पक्षाच्या लिंग पिसाट नेत्याकडून शोषित होणे देशाची मान खाली घालणारी घटना असून या क्षेत्रात येणाऱ्या लाखो मुलींना ब्रेक लावणारे ठरत आहे. मुंगीच्या पायातील घुंगराचा आवाज ऐकणाऱ्या मोदींना हे मुलीचे रुदन कसे ऐकू येत नाही हे कोडे आहे.

भाजपचा खासदार ब्रजभूषण सिंग याची आजवरची कारकीर्द बघितली तर लक्षात येते की त्याची कुस्तीच्या आखाड्यात उतरणाऱ्या मुलीकडे बघण्याची नजर कशी आहे. त्याच्यावर लैगिक आरोपांची सर्वत्र राळ उडत असताना तो कोडगेपणे त्यावर बोलताना दिसत आहे ,कुस्ती महासंघ किंवा देशाच्या क्रीडा खात्याला अजूनही त्याला पदावरून दूर करून कारवाई करावी किंवा चौकशी सुरु करावी असे वाटले नाही. कोणत्याही क्षेत्रात मुलींचे लैगिक शोषण आपल्या देशात चिंताजनक बाब बनली असताना आणि मुलींच्या सुरक्षेसाठी कठोर कायदे असताना गेली महिनाभर एका बाहुबली खासदाराचे बलाढ्य सरकार काहीही बिघडवू शकत नसेल तर हे सरकार " बेटी बचाव " हा नारा किती मनापासून देत आहे हे लक्षात येते. देशाची सुरक्षा आणि मुलींच्या आत्मसन्मानाशी ज्या देशात तडजोड करून मतांच्या बेगमीचा चिल्लर विचार होतो तिथे कुणाचीही सुरक्षा वाऱ्यावर ठेवली जाते.




जिने जगभरच्या स्पर्धातून भारताला यश मिळवून दिले त्या विनेश फोगट हिने हे आरोप काही आता केले नाहीत.तिने सांगितले की टोकियो ऑलिम्पिकमधून परतल्यानंतर 2021 मध्ये मी पंतप्रधान नरेंद्र मोदींना कुस्तीपटूंच्या लैंगिक छळाची माहिती दिली होती. त्यावेळी मी त्यांना एवढे उघडपणे सांगितले नाही. कारण मी स्वतः टोकियो ऑलिम्पिकमधून परतले होते. माझा एवढा छळ झाला की, मी इशाऱ्याने माझे विचार त्यांच्यापर्यंत पोहोचवले होते.मी सांगितले की, आमचा मानसिक छळ होत आहे. आम्हाला व आमच्या कुटुंबाला जीवे मारण्याच्या धमक्या मिळत आहेत. मुलींच्या बाबतीत खूप चुका होतात. आमचा सर्व प्रकारे छळ होत आहे, कृपया आम्हाला मदत करा. त्यावर त्यांनी मला सर्वकाही ठीक होईल असे आश्वासन दिले. मी येथे बसलो आहे. काळजी करू नका. खेळावल लक्ष केंद्रीत करा, असेही ते म्हणाले होते.

विनेश म्हणाली, त्यानंतरही बृजभूषण यांच्या कारवाया थांबण्याचे नाव घेत नव्हत्या. दरम्यान पंतप्रधानांनी मला क्रीडामंत्र्यांची भेट घेण्यास सांगितले. मी क्रीडा मंत्र्यांना भेटून सर्व काही सांगितले. पण मी त्यांना जे काही सांगितले, ते सर्व 24 तासांतच बृजभूषण यांना कळाले.त्यांना ही माहिती क्रीडा मंत्र्यांनी दिली की त्यांच्या कार्यालयातील लोकांनी दिली, हे मला ठावूक नाही. पण 24 तासांतच बृजभूषण यांना संपूर्ण प्रकार समजला. त्यानंतर माझ्या पतीला फोन आला की, तुम्ही पंतप्रधानांना असे कसे सांगितले.विनेश म्हणाली की, आम्हाला जीवे मारण्याच्या धमक्या सुरू झाल्या. तुझी हिम्मत कशी झाली? आम्ही तुम्हाला पाहतो. सोडणार नाही. मारून टाकू. तुम्ही नॅशनल कॅम्पला या. रस्त्याने लखनऊला या. अपघात होईल. आदी धमक्या दिल्या जात होत्या. त्यावेळी त्यांनी आम्हाला एवढा त्रास दिला की, आमच्या मनात आत्महत्येचे विचार येत होती. विनेश म्हणाली की, मी सर्व काही सांगितले तर हे लोक जाऊन बृजभूषण यांना सांगतील. त्यानंतर काहीतरी वाईट घडेल.

केंद्र सरकार आणि क्रीडाखाते काहीतरी थातुरमातुर कारणे देऊन महिला कुस्तीपटूंचा आवाज दाबण्याचा प्रयत्न करीत लिंगपिसाट खासदाराला वाचविण्याचा आटोकाट प्रयत्न करताना उभा देश बघत आहे. लैगिक अत्याचार सारख्या भयंकर प्रकरणात देशातील एकही मोठी हस्ती या मुलींच्या बाजूने उभी राहताना दिसत नाही सगळे कसे मूग गिळून गप्प बसले आहेत. याचा अर्थ लोकांना समजत नाही असे जर भाजप सरकारला वाटत असेल तर हे सरकार मुर्खांच्या नंदनवनात विहार करते आहे. लक्षात घ्या या प्रकरणी जर कारवाई होत नसेल तर उद्या कुणाच्याही मुली सुरक्षित वातावरणात खेळू किंवा शिकू शकणार नाहीत. त्यासाठी गावोगाव कोणत्याही निमंत्रणाची वाट न बघता शक्य होईल तेवढी आंदोलने सुरु झाली पाहिजेत. कोणता राजकीय पक्ष त्यासाठी पुढे येण्याची वाट बघू नका,या मुलींमध्ये तुम्हाला तुमची मुलगी दिसत असेल तर उठा आणि प्रत्येकाचा आवाज मोदींच्या कानापर्यंत जाऊ द्या.

## संपादकीय »


### आरक्षणाची मागणी, हेच अपयश!

***अखेर मणिपूरच्या हिंसाचारामागेही मुख्य मुद्दा तोच होता... आरक्षण आम्हालाही हवे! आरक्षणाची आपापल्या समाजगटासाठी मागणी गेल्या काही वर्षांत अनेक राज्यांमध्ये झालेली आहे.***

हे चित्र देशाची प्रगती दर्शवणारे नसून गेल्या ७५ वर्षांत सामान्य नागरिक, जनता यांचे गंभीर प्रश्न सोडवले नाहीत म्हणून हे आरक्षण मागितले जाते आहे, हे सरकारचे अपयशच म्हणावे लागेल. बरे ही मागणी त्या त्या राज्यातील सत्तेमध्ये वाटा असणारे समाजही करू लागले आहेत. हाती सत्ता असताना जनता गरीबच कशी राहिली हा विचार सरकारने करायला हवा. आरक्षण मागणी सत्तेत असलेल्या समाजांनी करणे म्हणजे प्रगती झाली नसल्याची कबुलीच, सरकारने व नेत्यांनी सत्तेचा दुरुपयोग करून समाजाला दुर्लक्षित ठेवल्याचा हा ठपकाच, असे म्हणावे लागते. आरक्षण कशामुळे मागावे लागते आहे, याचे मूल्यमापन राजकीय पक्ष व सरकारने करून याचा हिशेब जनतेला द्यायला हवा. अन्यथा न्यायालयाने याचे उत्तर त्या- त्या काळातील सरकारला विचारले पाहिजे.

**देशातील भाजप सरकारचे पहिलेवहिले पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे वर्णन त्यांचे विरोधक 'अ राइट पर्सन इन रॉंग पार्टी' असे करत असत. ती खरे तर वाजपेयींच्या ऋजू, सर्वसमावेशक व्यक्तिमत्त्वाला दिलेली दाद होती. पण एके काळी त्यांच्याकडे नेहरूवादी म्हणजेच एकप्रकारे उपरे म्हणूनच बघितले जात होते, हे 'वाजपेयी : द अ‍ॅसेंट ऑफ द हिंदू राइट : १९२४-१९७७' या अभिषेक चौधरी लिखित पुस्तकात वाचायला मिळते.**

## वाजपेयी म्हणे 'नेहरूवादी'!




त्यातील नेहरूवादाच्या उल्लेखाला संदर्भ आहे तो भारत-चीन युद्धाचा. या युद्धाच्या पार्श्वभूमीवर जनसंघाला नेहरूंचा राजीनामा हवा होता. त्यासाठी कम्युनिस्टेतर पक्षांनी एका सभेचे आयोजन केले होते. काँग्रेसचे, पण १९५२ नंतर कट्टर नेहरूविरोधक म्हणूनच ओळखले जाणारे आचार्य जे. बी. कृपलानी हेही त्या सभेत सहभागी होते. पण तरुण वाजपेयींनी आपल्या भाषणात नेहरूंचा राजीनामा मागण्यास साफ नकार दिला. एक म्हणजे केवळ सहाच महिन्यांपूर्वी काँग्रेस पक्ष तगड्या दोन तृतीयांश बहुमताने पुन्हा निवडून आला होता. त्याशिवाय युद्ध सुरू असताना त्याच्या मध्यावर नेहरूंच्या राजीनाम्याची मागणी करणे वाजपेयींना पूर्णपणे अव्यवहार्य वाटत होते. आचार्य कृपलानी यांना वाजपेयींची ही भूमिका अजिबातच पटली नाही. वाजपेयी हे जनसंघाचा पेहराव करून आलेले नेहरूवादी आहेत, अशी टीका त्यांनी केली. तेवढ्यावरच ते थांबले नाहीत, तर या मेळाव्यात त्यांनी स्वतंत्र पक्षाचे नेते मिनू मसानी यांना सांगितले की वाजपेयी या माणसावर अजिबात विश्वास ठेवू नका. तो नेहरूवादी आहे. आपल्यामधला नाही.

अर्थात आचार्य कृपलानी यांनी असे विधान पूर्वग्रहातून केले होते, असे लेखकाने म्हटले असले तरी तरुण वाजपेयींना नेहरूंचे अप्रूप होते, याची बरीच वर्णनेही या पुस्तकात येतात. 'बिलव्हेड नेमेसिस- द नेहरू इयर्स' हे प्रकरण त्यासंदर्भात वाचण्यासारखे आहे. वाजपेयी भारतीय जनसंघाचे उमेदवार म्हणून पहिल्यांदा संसदेत निवडून गेले तेव्हा नेहरू ६८ वर्षांचे होते आणि वाजपेयी अवघे ३२. विरोधी पक्षामधला खासदार म्हणून नेहरूंनी वाजपेयींना अजिबातच गणले नाही, असे झाले नाही. उलट 'जनसंघासारख्या प्रतिगामी पक्षामधला छान, तेजस्वी माणूस' असे या तरुण खासदाराबद्दल नेहरूंचे मत तयार झाले होते.

हरूंनी वाजपेयी भविष्यात भारताचे पंतप्रधान होतील असे म्हटले होते, असा दावा याआधी अनेकांनी केला आहे. तो लेखक चौधरी यांनी खोडून काढला आहे. ते लिहितात की १९५७ मध्ये उत्तर प्रदेशातील तेव्हाच्या बलरामपूर मतदारसंघातून विजयी होऊन लोकसभेत प्रवेश केल्यानंतर वाजपेयींनी केलेल्या पहिल्याच भाषणाला नेहरूंकडून चांगला प्रतिसाद मिळाला. हे भाषण झाले ते १५ मे रोजी. त्यात वाजपेयींनी काश्मीर धोरणासह अनेक मुद्द्यांवरून नेहरूंच्या निष्क्रियतेची खिल्ली उडवली होती. "आपण सैन्य पाठवून एक तृतीयांश काश्मीर मुक्त करायचे का? नाही, नाही.. आपण ते पाकिस्तानला भेट द्यायचे का? नाही नाहीङ्घ आपण गोव्यात पोलीस कारवाई करायची का?

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक ः *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक ः MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# निर्णय 16 नव्हे, 54 आमदारांचा!

## राहुल नार्वेकर यांचे सूचक विधान, फुटीचे लेखी निवेदन नसल्याचा दावा

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**शिवसेना विधिमंडळ पक्षात फूट पडल्याचे कोणतेही लेखी निवेदन माझ्यापुढे अद्याप सादर झालेले नसून १६ नव्हे, तर ५४ शिवसेना आमदारांच्या अपात्रतेसंदर्भातील याचिकांवर निर्णय घ्यायचा आहे, असे सूचक वक्तव्य विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी शुक्रवारी केले. 'इंडियन एक्स्प्रेस' आयोजित 'आयडिया एक्सचेंज' कार्यक्रमात ते बोलत होते.**



उद्धव ठाकरे यांना बहुमत चाचणी करण्याचे राज्यपालांचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने बेकायदेशीर ठरविले, पण ठाकरे यांनी स्वेच्छेने राजीनामा दिल्याने त्यांची पुन्हा मुख्यमंत्रीपदी नियुक्ती करता येणार नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले आहे. न्यायालयाच्या या मुद्द्याशी नार्वेकर यांनी असहमती दर्शविली. ठाकरे हे राजीनामा न देता विश्वासदर्शक ठरावाला सामोरे गेले असते, तरी बहुमत नसल्याने सरकार पडलेच असते. मग राज्यपालांचा आदेश चुकीचा ठरवून न्यायालयाने रद्द केला, तरी बहुमत नसलेल्या मुख्यमंत्र्यांना पुन्हा त्यापदावर नियुक्ती करणे कसे योग्य ठरले असते, असा सवाल नार्वेकर यांनी केला. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर अपात्रतेच्या याचिकांबाबत नार्वेकर म्हणाले, की शिवसेनेत फूट पडली असल्याचे कोणतेही लेखी निवेदन व पुरावे माझ्यापुढे सादरच झालेले नाहीत.

विधिमंडळ नियमावलीनुसार अध्यक्षांचे अधिकार विधानसभेपुरतेच मर्यादित होते. पण न्यायालयाने त्यांची व्याप्ती वाढविली आहे. आता पक्षप्रतोदाचा निर्णय घेताना राजकीय पक्ष, त्याची घटना, प्रमुख, कोणाकडे बहुमत आहे हे तपासून प्रतोदाला मान्यता द्यावी लागणार आहे. माझ्यापुढे दोन्ही गटांनी एकमेकांविरोधात एकूण ५४ याचिका सादर केल्या आहेत. सुयोग्य वेळेत (रिझनेबल टाइम) निर्णय घेण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. प्रत्येक याचिकाकर्त्यांला आणि प्रतिवादीला बाजू मांडण्याची संधी द्यावी लागेल. साक्ष व उलटतपासणी होईल. नैसर्गिक न्याय तत्त्वाचे आणि पुरावा कायद्यातील तरतुदींचे पालन केले जाईल. त्यामुळे सुनावणीसाठी किती कालावधी लागेल, हे आताच सांगता येणार नाही. पण लवकरात लवकर निर्णय देण्याचा माझा प्रयत्न राहील. भरत गोगावले यांना प्रतोद म्हणून मान्यता देताना पक्ष, प्रमुख आणि अन्य बाबी तपासण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे प्रतोद नियुक्तीविषयी शक्य तितक्या लवकर निर्णय घेतला जाईल, असे नार्वेकर यांनी स्पष्ट केले.

### 'सर्व बाबी तपासून प्रतोदांची नियुक्ती'

**भरत गोगावले यांची प्रतोदपदी झालेली नियुक्ती संसदीय पक्षाने केल्याने न्यायालयाने रद्दबातल केली आहे. आता प्रतोद म्हणून मान्यता देताना पक्ष, प्रमुख आणि अन्य बाबी तपासण्याचे निर्देश न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे सध्या शिवसेनेचे प्रतोद कोण, नवीन प्रतोद नियुक्ती करण्यासाठी किती कालावधी लागेल, आदी बाबींविषयी शक्य तितक्या लवकर निर्णय घेतला जाईल, असे नार्वेकर यांनी स्पष्ट केले.**

### तर ठाकरे गटाचे 15 आमदार अपात्र ठरतील"

महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षावर गुरवारी सुप्रीम कोर्टात सुनावणी झाली. सुप्रीम कोर्टाने राज्यपालांचे निर्णय आणि विधीमंडळात घडलेल्या अनेक घटनांवर ताशेरे ओढले. परंतु उद्धव ठाकरे यांचं सरकार पुनर्स्थापित करता येणार नाही असंही म्हटलं आहे. त्याचबरोबर १६ आमदारांच्या अपात्रतेचा निर्णय सुप्रीम कोर्टाने विधानसभेच्या अध्यक्षांकडे सोपवला आहे. आता सर्वांचं लक्ष विधानसभा अध्यक्षांच्या सुनावणीकडे लागलं आहे. दरम्यान, हे सर्व १६ आमदार अपात्र ठरतील, असा विश्वास ठाकरे गटाने व्यक्त केला आहे. तर दुसऱ्या बाजूला शिंदे गटाने म्हटलं आहे की, ठाकरे गटाचे १५ आमदार अपात्र ठरतील.

याबाबत माध्यमांच्या प्रतिनिधींनी शिंदे गटाचे प्रवक्ते संजय शिरसाट यांना प्रश्न केल्यावर शिरसाट म्हणाले, निवडणूक आयोगाने शिंदे साहेबांच्या शिवसेना पक्षाला अधिकृत पक्ष म्हणून मान्यता दिली आहे, या निर्णयाला सुप्रीम कोर्टाने चुकीचं ठरवलेलं नाही. सुप्रीम कोर्टाने केवळ प्रतोदांच्या आणि गटनेत्यांच्या नियुक्तीला बेकायदेशीर ठरवलं आहे. पक्ष, पक्षाचं नाव आणि पक्षचिन्ह आम्हाला मिळालं आहे. सुप्रीम कोर्टाने विधानसभा अध्यक्षांना आदेश दिला आहे की, यावरही चौकशी करा.

शिरसाट म्हणाले, सुप्रीम कोर्टाने सांगितलं आहे की, पक्ष कोणाचा किंवा चिन्ह कोणाचं यावर सखोल अभ्यास करून निर्णय द्यावा. प्रतोदांबद्दलच्या निर्णयाबद्दल बोलायचं झाल्यास अध्यक्ष त्यावर सुनावणी घेतील. त्यानंतर ठरेल की, पक्ष प्रतोद नेमका कोण असेल.

# मी मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीत... : राधाकृष्ण विखे-पाटलांचे विधान

## मंत्रिमंडळ विस्तार, भारतीय जनता पक्ष विरोधकांची एकी अशा विषयासंदर्भात केले भाष्य

। पुणे।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मी मुख्यमंत्री पदाच्या शर्यतीमध्ये असल्याच्या अफवा उठविण्यात येत आहेत. आगामी निवडणूक मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या समवेत लढविण्यात येणार असल्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाहीर केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आमचे नेते आहेत. त्यामुळे मुख्यमंत्रीपदाच्या शर्यतीमध्ये मी नाही, असे राज्याचे महसूल, पशुसंवर्धन आणि दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे-पाटील यांनी सांगितले.**



पुणे विद्यार्थी गृहाच्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमासाठी आले असताना राधाकृष्ण विखे-पाटील यांनी पत्रकारांशी संवाद साधला. सत्तासंघर्षाबाबत न्यायालयाने दिलेला निकाल, मंत्रिमंडळ विस्तार, भारतीय जनता पक्ष विरोधकांची एकी अशा विषयासंदर्भात त्यांनी भाष्य केले.

यासंदर्भात विचारणा केली असता राधाकृष्ण विखे-पाटील म्हणाले की, नैतिकतेची भाषा उद्धव ठाकरे यांना शोभत नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नावाखाली ठाकरे यांनी मते मागितली. युती म्हणून कौल असताना भाजपशी दगाफटका केला.

स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्यासंदर्भात अवमानकारक विधान करणारे काँग्रेसला साथ दिली.

औरंगजेबच्या कबरीवर फुले उधळणाऱ्यांची बाजू घेणाऱ्या ठाकरे यांनी नैतिकतेची भाषा करणे अयोग्य आहे. सर्वोच्च न्यायालयाने शिंदे-फडणवीस सरकारला कौल दिला आहे. त्यामुळे १६ आमदारांना अपात्र ठरविण्याचा प्रश्नच येत नाही. सरकार स्थिर असल्याने येत्या काही दिवसांत मंत्रिमंडळाचा विस्तार होण्याची अपेक्षा आहे.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस योग्य वेळी मंत्रिमंडळाचा विस्तार करतील, असे विखे-पाटील यांनी सांगितले. भाजप विरोधातील पक्ष एकत्र झाले असले तरी त्याचा काही परिणाम होणार नाही. महाविकास आघाडीने व्रजमूठ बांधली मात्र त्याची पकड सैल झाल्याचे विविध घटनांवरून दिसून येत आहे. आगामी निवडणुकीत भाजप-शिवसेनेचे सरकार बहुमातने निश्चितच सत्तेत येईल. मुंबईचे माजी पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांच्यावरील सर्व आरोप सरकारने मागे घेतले असून निलंबनही रद्द केले आहे.

कॅटच्या निर्णयानुसार हा निर्णय झाला आहे, असे विखे-पाटील यांनी स्पष्ट केले.

### उद्धव ठाकरेंना नैतिकतेची भाषा शोभत नाही

**युती म्हणून मतदारांचा कौल मिळाल्यानंतरही भारतीय जनता पक्षाच्या पाठीत खंजीर खुपसणाऱ्या आणि सत्तेसाठी लाचार होणाऱ्या उद्धव ठाकरे यांना नैतिकतेची भाषा शोभत नाही, अशी टीका राधाकृष्ण विखे-पाटील यांनी येथे केली. सर्वोच्च न्यालालयाच्या निकालानंतर शिंदे-फडणवीस सरकारला कोणताही धोका नसल्याचे स्पष्ट झाले आहे. मात्र, न्यायालयाने निकालात काही गोष्टी बेकायदा ठरविल्या आहेत. त्यामुळे नैतिकता स्वीकारून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी उद्धव ठाकरे यांनी केली आहे.**

# भाजप की काँग्रेस? आज मतमोजणी!

## कर्नाटक निवडणूक निकाल 2023 : कर्नाटकचा किंग कोण, कुणाची सत्ता येणार?

। बंगळूरु । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**कर्नाटक विधानसभेच्या २२४ मतदारसंघांसाठी १० मे रोजी झालेल्या निवडणुकीची मतमोजणी आज, शनिवारी होणार आहे. मतदानोत्तर चाचण्यांचे निष्कर्ष काँग्रेसच्या बाजूचे असले तरी ते खरे ठरतात की मतदार दुसऱ्यांदा भाजपलाच संधी देऊन सलग एकाच पक्षाकडे सत्ता न देण्याची राज्यातली ३८ वर्षे जुनी परंपरा खंडीत करतात, याबद्दल उत्सुकता आहे.**




या वेळी राज्यात विक्रमी ७३.१९ टक्के मतदान झाले. नवमतदारांबरोबरच ज्येष्ठ मतदारांनीही उत्साहाने मतदान केले होते. सकाळी ८ वाजता राज्यभरात ३६ केंद्रांवर मतमोजणी सुरू होईल. मतमोजणीसाठी सर्व केंद्रांवर पुरेशी सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे. साधारणतः दुपापर्यंत मतदारांनी कोणाला कौल दिला आहे त्याचे चित्र स्पष्ट होईल अशी अपेक्षा आहे. मुख्यतः सत्ताधारी भाजप, मुख्य विरोधी पक्ष काँग्रेस आणि धर्मनिरपेक्ष जनता दल (जेडीएस) यांच्यामध्ये लढत झाली. मात्र चुरस भाजप आणि काँग्रेस या दोन राष्ट्रीय पक्षांमध्येच होती. राष्ट्रवादी काँग्रेस, दिल्ली आणि पंजाबमधील सत्ताधारी आम आदमी पक्षानेही या निवडणुकीत उमेदवार उभे केले होते. त्याशिवाय महाराष्ट्राचे लक्ष सीमाभागातील महाराष्ट्र एकीकरण समितीच्या कामगिरीकडे असेल.

भ्रष्टाचाराच्या आरोपांनी त्रस्त झालेल्या भाजपची प्रचारात सर्व मदार मुख्यतः पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर होती. कर्नाटकात गेल्या ३८ वर्षांपासून कोणत्याही सरकारला सलग दुसऱ्यांदा सत्ता मिळवता आलेली नाही. मात्र, मोदींच्या लोकप्रियतेच्या आधारे हा इतिहास पुसण्याची भाजपची इच्छा आहे. तर सतत पराभव सहन करणाऱ्या काँग्रेसच्या दृष्टीने राष्ट्रीय पातळीवर चैतन्य निर्माण करण्यासाठी कर्नाटकातील विजय अतिशय महत्त्वाचा आहे. यंदा काँग्रेसचे नेतृत्व कन्नड भूमिपुत्राच्या हाती असल्याचा पक्षाला फायदा होईल, अशी आशा काँग्रेसच्या नेत्यांना वाटत आहे. भाजप आणि काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांनी प्रचारासाठी भरपूर मेहनत घेतली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशिवाय केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री बसवराज बोम्मई आणि माजी मुख्यमंत्री बी. एस. येडियुरप्पा यांनी झंझावाती प्रचार केला, तर काँग्रेसच्या प्रचाराची धुरा राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांच्यासह माजी मुख्यमंत्री सिद्धरामय्या आणि प्रदेशाध्यक्ष डी. के. शिवकुमार यांनी सांभाळली. गेल्या वर्षी राहुल गांधींच्या नेतृत्वात निघालेल्या 'भारत जोडो' यात्रेला कर्नाटकात चांगला प्रतिसाद मिळाला होता. त्याचाही फायदा होण्याची पक्षनेतृत्वाला आशा आहे. मतदानोत्तर चाचण्यांनी सर्वाधिक जागा काँग्रेसला मिळतील, असा अंदाज व्यक्त केला आहे. काँग्रेसबरोबरच भाजपनेही विजयाचा दावा केला आहे. जेडीएसला मात्र त्रिशंकू विधानसभेची अपेक्षा आहे, तसे झाल्यास पक्षाला सरकार स्थापनेमध्ये भूमिका बजावता येईल आणि माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांना किंगमेकर होता येईल, अशी अपेक्षा पक्षाच्या नेत्यांना आणि कार्यकर्त्यांना वाटत आहे. मतदानोत्तर चाचण्यांनी व्यक्त केलेल्या अंदाजापेक्षा आम्हाला जास्त जागा मिळतील आणि काँग्रेस बहुमत मिळवून सरकार स्थापन करेल, असे ते म्हणाले. राज्यात काँग्रेसची लाट आहे, असा दावा करताना, राज्यात त्रिशंकू स्थिती निर्माण होण्याची किंवा पुन्हा 'रिसॉर्टचे राजकारण' रंगण्याची शक्यताही त्यांनी फेटाळली.

### भाजपला विजयाबद्दल विश्वास

**» मुख्यमंत्री बसवराज बोम्मई आणि भाजपच्या नेत्यांची माजी मुख्यमंत्री बी. एस. येडियुरप्पा यांच्या निवासस्थानी बैठक झाली. या वेळी पक्षाला बहुमत मिळण्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला. इतर पक्षांबरोबर आघाडी सरकार स्थापन करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही, असे मुख्यमंत्री बोम्मई म्हणाले. आम्हाला जादूई आकडा गाठता येईल, असा विश्वास आहे, असा दावा त्यांनी केला. १४१ जागा जिंकण्याचा काँग्रेसचा दावा काँग्रेस किमान १४१ जागांवर विजय मिळवेल, असा दावा पक्षाचे प्रदेशाध्यक्ष डी. के. शिवकुमार यांनी केला.**

# भारत वैद्यकीय पर्यटनाचे केंद्र बनणार?

## केंद्र सरकारच्या योजना नेमक्या आहेत तरी काय?

।पुणे।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**'जी-२०'चे अध्यक्षपद भूषविणाऱ्या भारतात वैद्यकीय पर्यटन वाढावे यासाठी केंद्र सरकारकडून विशेष प्रयत्न केले जात आहे. वैद्यकीय उपचारासाठी परदेशी नागरिकांनी भारतात यावे यासाठी योजना आखल्या जात असून नवी दिल्ली येथे नुकतेच 'वन अर्थ वन हेल्थ – ॲडव्हांटेज हेल्थकेअर इंडिया' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. ७० हून अधिक देशांतील ५०० प्रतिनिधींसह वैद्यकीय, आरोग्य व उद्योग क्षेत्रांतील तज्ज्ञ या शिखर परिषदेला उपस्थित होते. वैद्यकीय पर्यटन केंद्र बनण्याच्या भारताच्या या योजना नेमक्या काय आहेत याविषयी...**



### वैद्यकीय पर्यटन म्हणजे काय?

वैद्यकीय उपचार घेण्यासाठी एखादी व्यक्ती स्वतःच्या देशातून दुसऱ्या देशात जात असेल तर या प्रक्रियेला वैद्यकीय पर्यटन म्हणतात. स्वदेशात महागडे उपचार किंवा आधुनिक उपचारांचा अभाव यामुळे अनेक रुग्ण उपचारांसाठी परदेशात जातात. प्रामुख्याने निवडक किंवा जटिल शस्त्रक्रिया करण्यासाठी आंतरराष्ट्रीय सीमा ओलांडून रुग्ण प्रवास करतात. वैद्यकीय पर्यटनातील भागधारकांमध्ये हवाई वाहतूक कंपन्या, रुग्णालये, वैद्यकीय केंद्रे, आरोग्य केंद्रे (वेलनेस सेंटर), हॉटेल यांचा समावेश होतो. सध्या कॅनडा हा देश वैद्यकीय पर्यटनासाठी सर्वाधिक मागणी असणारा देश आहे. उच्च गुणवत्तेच्या वैद्यकीय सुविधा व सेवा पुरविणाऱ्या कॅनडामध्ये सरकारी रुग्णालयांमध्ये मोठ्या प्रमाणात परदेशी रुग्ण उपचार घेतात.

### भारतातील वैद्यकीय पर्यटन उद्योगाचा धांडोळा...

भारतातील वैद्यकीय पर्यटन गेल्या दशकभरात वाढले आहे. २०१५ ते २०१८ या काळात वैद्यकीय पर्यटकांची संख्या २.३४ लाखांवरून ४.९५ लाखांपर्यंत वाढली आहे. दरवर्षी भारतात साधारण २० लाख परदेशी नागरिक वैद्यकीय उपचारांसाठी येतात. बहुतेक रुग्ण बांगलादेश आणि अफगाणिस्तानातील आहेत. भारताच्या शेजारी देशांव्यतिरिक्त इराक, ओमान, मालदीव, येमेन, उझबेकिस्तान आणि सुदानमधील रुग्णांनी प्रगत सुविधा, कुशल डॉक्टर आणि उपचारांचा कमी खर्च यामुळे वैद्यकीय सेवेसाठी भारताची निवड केली. वैद्यकीय पर्यटनाच्या माध्यमातून २०२२ मध्ये ७ कोटी ४१ लाख ७० हजार डॉलर इतके परदेशी चलन भारताने कमावले.

### वैद्यकीय पर्यटनाच्या बाबतीत भारतातील स्थिती

**» भारतातही दरवर्षी लाखो लोक वैद्यकीय पर्यटनासाठी येतात. अत्याधुनिकतेची कास धरणारे भारतीय वैद्यकीय क्षेत्र परदेशी उपचारांच्या मानाने कमी खर्चीक आहे. त्यातच येथे वैयक्तिक देखभाल मिळत असल्याने भारतातील वैद्यकीय उपचारांसाठी येणाऱ्या परदेशी प्रवाशांची संख्या वाढताना दिसत आहे. किफायतशीर आरोग्य सेवा, दर्जेदार निदान उपकरणे आणि प्रशिक्षित डॉक्टर यामुळे वैद्यकीय पर्यटकांसाठी भारत एक पसंतीचे ठिकाण आहे. भारतीय वैद्यकीय क्षेत्रात काम करणाऱ्या अनेकांना इंग्रजी भाषा ज्ञात असल्याने परदेशी रुग्णांशी किंवा त्यांच्या नातलगांशी सहज संवाद साधला जातो. भारतात विविध आजारांवर उपचार करण्यासाठी आयुर्वेद, योग, निसर्गोपचार आणि इतर पारंपरिक उपचार पद्धती असल्याने वैद्यकीय पर्यटनाला चालना मिळत आहे. कमी पैशांमध्ये दर्जेदार आणि चांगली वैद्यकीय सुविधा मिळत असल्यामुळे उपचार घेण्यासाठी विकसित देशांतील नागरिकही भारतात येतात. पाश्चिमात्य देशांच्या तुलनेत भारतातील वैद्यकीय खर्च ३० टक्क्यांनी कमी आहे. वैद्यकीय पर्यटन निर्देशांकानुसार भारत वैद्यकीय पर्यटनासाठी जागतिक स्तरावर दहाव्या क्रमांकावर आहे.**

# मनोज बाजपेयी यांच्या आगामी चित्रपटाचे शूटिंग झाले



विनोद भानुशाली यांच्या भानुशाली स्टुडिओज लिमिटेड तसेच सुपर्ण एस वर्मा आणि झी स्टुडिओज आता प्रेक्षकांसाठी मनोज बाजपेयी अभिनीत एक पॉवर-पॅक कोर्टरूम ड्रामा घेऊन येण्यासाठी सज्ज झाले आहेत. या चित्रपटाचे जोधपूर शेड्यूल पूर्ण झाल्यानंतर निर्मात्यांनी चित्रपटाचे शूटिंग मुंबईत पूर्ण केले. अलीकडेच, मनोज बाजपेयी यांनी या अनटायटल्ड चित्रपटाचे शूटिंग पूर्ण केले असून हा चित्रपट 2023 मध्ये प्रदर्शित होण्याची अपेक्षा आहे.

चित्रपटाच्या शेवटच्या सीनचे शूटिंग करताना सर्व कलाकार आणि क्रू यांनी पॉवरहाऊस अभिनेता मनोज बाजपेयी यांचे उभे राहून अभिवादन केले, हा एक तीव्र कोर्टरूम सीन होता. यानंतर केक कापून चित्रपटाचे शूटिंग पूर्ण झाल्याचा आनंद साजरा करण्यात आला. तसेच, या बहुप्रतिक्षित चित्रपटात केलेल्या कामाबद्दल संपूर्ण टीमने कृतज्ञतादेखील व्यक्त केली. अशातच, दिग्दर्शक अपूर्व सिंग कार्की या हार्ड हिटिंग चित्रपटाद्वारा हिंदी चित्रपटांमध्ये पदार्पण करत असून या चित्रपटात उत्कृष्ट कलाकारांना पाहायला मिळेल.

झी स्टुडिओज आणि भानुशाली स्टुडिओज द्वारा प्रस्तुत, अपूर्व सिंग कार्कीद्वारा दिग्दर्शित, सुपर्ण एस वर्माच्या या कोर्टरूम ड्रामाची निर्मिती विनोद भानुशाली, कमलेश भानुशाली, आसिफ शेख आणि विशाल गुरनानी यांनी केली आहे. तसेच, हा चित्रपट 2023 मध्ये प्रदर्शित होण्याची अपेक्षा आहे.

# 500 रुपये पगारापासून मनीष मल्होत्राने केली होती करिअरची सुरुवात...

देशातील सुप्रसिद्ध फॅशन डिझायनर मनीष मल्होत्राचा आज 56 वा वाढदिवस आहे. बॉलिवूडमधील अनेक कलाकार मनीष मल्होत्राने डिझाइन केलेले ड्रेस परिधान करतात. बॉलिवूड कलाकारांचा हा सर्वाधिक आवडता डिझायनर आहे. मोठमोठ्या रँप वॉकमध्ये, रेड कार्पेट तसेच कलाकारांच्या लग्न समारंभामध्ये देखील बॉलिवूड कलाकारांची पहिली पसंत मनीष मल्होत्रा आहे. आजच्या काळात मनीष मल्होत्राकडे प्रचंड पैसा, संपत्ती आहे. मात्र, त्याच्या आयुष्यातील एक काळ असा होता ज्यावेळी त्याचा पगार फक्त 500 रुपये होता.

एका मुलाखतीत मनीष मल्होत्राने स्वतः आपल्या करिअरचा प्रवास सांगितला होता. त्यावेळी तो म्हणाला होता की, तो लहानपणापासून पंजाबमध्ये वाढला. त्याला जे काही करायचे होते त्यासाठी त्याच्या



आईने त्याला साथ दिली. अभ्यासाच्या बाबतीत तो थोडा कमी होता. बॉलिवूडसाठी आपलं प्रेम व्यक्त करत त्याने सांगितलं की, त्याला चित्रपट पाहण्याची खूप आवड होती. तो प्रत्येक चित्रपट आवर्जून पाहतो. तसेच सहावीमध्ये असताना त्याने चित्रकलेचा क्लास लावला होता. त्यावेळी त्याला कलर आणि आर्टसंबंधित गोष्टी त्याला आवडू लागल्या. यातून हळूहळू त्याला कपड्यांना फॅशन करणं आवडू लागलं. पुढे कॉलेजमध्ये गेल्यावर त्याने मॉडलिंगसोबत एका बुटिकमध्ये काम करायला सुरुवात केली. याठिकाणी तो डिझाइनच्या विविध पद्धती शिकला. त्यावेळी त्याला दर महिन्याला 500 रुपये पगार दिला जायचा. हळूहळू त्याने आपल्या कामामध्ये खूप मेहनत घेतली. वयाच्या 25 व्या वर्षी त्याला बॉलिवूडमधील पहिली संधी मिळाली. अभिनेत्री जुही चावलाच्या एका चित्रपटातील ड्रेस डिझाइन करण्याची त्याला संधी मिळाली. त्यानंतर त्यासाठी त्याला फिल्मफेअर अवॉर्ड देखील देण्यात आला. 2005 मध्ये मनीष मल्होत्राने आपलं लेबल लॉंच केलं.

# 'किसी का भाई किसी की जान'मधील लूक

बॉलिवूड अभिनेता सलमान खानचा 2022 मध्ये एकही चित्रपट प्रदर्शित झालेला नाही. त्याचे चाहते त्याच्या आगामी चित्रपटांची आतुरतेने वाट पाहत आहेत. सध्या सलमानचा 'किसी का भाई किसी की जान' चित्रपट प्रचंड चर्चेत आहे. हा चित्रपट 2023 मधील ईद दिवशी हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. तर दिवाळीमध्ये सलमानचा 'टायगर 3' चित्रपट प्रदर्शित होईल. दरम्यान, नुकतंच सलमानने त्याच्या सोशल मीडिया अकाऊंटवरुन त्याच्या 'किसी का भाई किसी की जान' चित्रपटाची शूटिंग पूर्ण झाली असून चित्रपटातील एक फोटो शेअर केला आहे. सलमानच्या या फोटोने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे.

सलमान खानने शेअर केला 'किसी का भाई किसी की जान'मधील लूक



सलमान खानने त्याच्या ट्वीटर अकाऊंटवरु 'किसी का भाई किसी की जान'त्याच्या फर्स्ट लूक शेअर केला असून त्याने या चित्रपटाचे शूटिंग पूर्ण झाल्याची माहिती दिली आहे. तसेच या फोटोमध्ये त्याने ब्लॅक कलरचे डेनिम आणि टी-शर्टसोबत मल्टीकलरचे जॅकेट घातले आहे.

या चित्रपटाचे दिग्दर्शन फरहाद सामजीने केले असून या चित्रपटामध्ये सलमान सोबत पूजा हेगडे, शहनाज गिल, पलक तिवारी, सिद्धार्थ निगम, जस्सी गिल आणि राघव जुयाल दिसून येतील. तसेच व्यंकटेश आणि जगतपति बाबू देखील महत्वाच्या भूमिका साकारताना दिसतील.

# "प्रत्येक दिवसच आईमुळे..."

महाराष्ट्राची हास्यजत्रा' या कार्यक्रमामधील कलाकारांवर प्रेक्षक भरभरुन प्रेम करतात. शिवाय कार्यक्रमामधील अनेक कलाकार त्यांच्या विनोदी शैलीमुळे प्रकाश झोतात आले. त्यातीलच एक कलाकार म्हणजे प्रभाकर मोरे. प्रभाकर मोरे सध्या सोशल मीडियावर अधिक सक्रिय आहेत. प्रेक्षकांना खळखळून हसवण्यात ते यशस्वी ठरले. पण त्याचबरोबरीने सोशल मीडियाद्वारेही विविध पोस्ट शेअर करत ते चाहत्यांबरोबर संपर्कात राहण्याचा प्रयत्न करतात.



मध्यंतरी प्रभाकर यांनी त्यांच्या पत्नीबरोबरचे काही फोटो व व्हिडीओ इन्स्टाग्राम अकाऊंटद्वारे शेअर केले होते. त्यांच्या या फोटो व व्हिडीओला चाहत्यांचीही अधिकाधिक पसंती मिळाली. इतकंच नव्हे तर प्रभाकर आपल्या खासगी आयुष्याबाबतही सोशल मीडियाद्वारे माहिती देताना दिसतात. आताही त्यांनी त्यांच्या आईचा एक फोटो शेअर केला आहे. हा फोटो शेअर करत असताना त्यांनी आईसाठी खास संदेश लिहिला आहे. इन्स्टाग्राम स्टोरीद्वारे शेअर केलेल्या या फोटोमधून प्रभाकर यांचं त्यांच्या आईवर किती प्रेम आहे हे दिसून आलं.

# मोदी बायोपिकचं दिग्दर्शन करणार हॉलिवूड अभिनेता जॉनी डेप

हॉलिवूडचा प्रसिद्ध अभिनेता जॉनी डेप २६ वर्षांनंतर पुन्हा एकदा दिग्दर्शक म्हणून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. जॉनी डेप 'मोदी' नावाचा बायोपिकचं दिग्दर्शन करणार आहे. या बायोपिकमध्ये प्रसिद्ध अभिनेता अल पचिनो यांची प्रमुख भूमिका असून लवकरच चित्रीकरणाला सुरुवात होणार आहे. हॉलिवूड सुपरस्टार जॉनी डेप २६ वर्षांच्या प्रदीर्घ काळानंतर पुन्हा एकदा दिग्दर्शक म्हणून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. मोदी बायोपिक नावाच्या सिनेमाचं दिग्दर्शन जॉनी करणार आहे. या सिनेमात प्रसिद्ध अभिनेते अल पचिनो या बायोपिकमध्ये महत्वाची भूमिका साकारणार आहेत. मोदी बायोपिकहा इटालियन कलाकार एमेडियो मोदिग्लिआनी याच्या आयुष्यावर आधारीत आहे. जॉनी डेप यानं १९९७ मध्ये प्रदर्शित झालेल्या



द ब्रेव सिनेमाचं दिग्दर्शन केलं होतं. या सिनेमात जॉन डेप आणि मार्लन ब्रैंडो यांच्या प्रमुख भूमिका होत्या. गेल्या काही दिवसांपूर्वी जॉनी डेप आणि अभिनेत्री अंबर हर्ड दोघंजण त्यांच्या घटस्फोटाच्या खटल्यामुळे खूपच चर्चेत होते. त्या दोघांच्या घटस्फोटाच्या लाईव्ह खटल्यानं संपूर्ण जगाचं लक्ष त्यांनी वेधून घेतलं होतं. हा खटला जिंकल्यानंतर जॉनी डेप पुन्हा कामाला लागला आहे. त्याचा जीन डु बैरी हा सिनेमाचा प्रिमियर कान फिल्म फेस्टिव्हलला होणार आहे. डेडलाईन नं दिलेल्या बातमीनुसार मोदी या बायोपिकमध्ये जॉनी इटालियन कलाकार रिकार्डो स्कैमार्सियो ही भूमिका साकारणार आहे.'

# मुंबईचा नाद करायचा नाय...!

## एकटाच सूर्या गुजरातवर भारी, विजयासह घेतला व्याजासहीत बदला

। मुंबई ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**सूर्यकुमार यादवच्या शतकाच्या जोरावर मुंबईने मोठा विजय साकारला. या विजयासह मुंबईने गुजरातचा बदला घेतला. कारण दोन्ही संघांत यापूर्वी सामना झाला होता आणि त्यामध्ये गुजरातने विजय मिळवला होता. या पराभवाची सव्याज परतफेड मुंबईने केली. मुंबईच्या २१९ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना गुजरातची चांगली सुरुवात होऊ शकली नाही. गुजरातला दुसऱ्या षटकापासूनच एकामागून एक धक्के बसायला लागले. त्यामुळे त्यांना हा सामना जिंकता आला नाही. मुंबईने यावेळी अचूक आणि भेदक गोलंदाजी केली. त्यामुळेच मुंबईला या सामन्यात २७ धावांनी दणदणीत विजय मिळवता आला.**




रोहित शर्मा आणि इशान शर्मा यांनी मुंबईला झोकात सुरुवात करून दिली. त्यामुळे पहिल्या पॉवर प्ले मध्ये मुंबईच्या संघाने एकही विकेट न गमावता अर्धशतक पूर्ण केले होते. त्यामुळे मुंबईचा संघ आता धावांचा विक्रम करेल, असे वाटत होते. पण पॉवर प्ले नंतरच्या पहिल्याच चेंडूवर रोहित शर्माला रशिद खानने बाद केले. रोहितने यावेळी १८ चेंडूंत २ चौकार आणि तीन षटाकारांच्या जोरावर २९ धावा केल्या. रोहितने या सामन्याक २५० षटकारही पूर्ण केले. त्याचबरोबर रोहित गेल्या पाचही डावांमध्ये दोन अंकी धावसंख्या उभारू शकला नव्हता. पण या सामन्यात मात्र आठव्याच चेंडूवर रोहित शर्माने दोन अंकी धावसंख्या पूर्ण केली. रोहितनंतर त्याच षटकात इशान किशनलाही रशिद खानने बाद केले. इशानने यावेळी २० चेंडूंत चार चौकार आणि एका षटकाराच्या जोरावर ३१ धावा केल्या. मुंबईची गुजरातने बिन बाद ६१ वरून २ बाद ६६ अशी अवस्था केली होती. त्यावेळी मुंबईच्या पाठिशी उभा राहीला तो सूर्यकुमार यादव.

सूर्या कसा तळपू शकतो, हे आज पुन्हा एकदा पाहायला मिळाले. आतापर्यंत सूर्याचे अर्धशतक पाहिले होते. पण या सामन्यात सूर्याचे अर्धशतक पाहायला मिळाले. सूर्याने आपले अर्धशतक ३२ चेंडूंत केले होते. त्यावेळी सूर्या शतक झळकावेल असे कोणालाही वाटत नव्हते. पण सूर्याने अर्धशतक पूर्ण केले आणि त्यानंतर फटकेबाजीचा गिअर बदलला. सूर्याने यावेळी त्यानंतर फक्त १७ चेंडूंत आपले पूर्ण अर्धशतक झळकावले.

### सूर्याचा शमीला वादळी षटकार

**सूर्यकुमार यादवनं त्याच्या आयपीएल करिअरमधील पहिलं शतक केलं. सूर्यकुमार यादवची ही खेळी सर्वांच्या दीर्घकाळ स्मरणात राहिल. सूर्यकुमार यादवनं ४९ बॉलमध्ये १०० धावा पूर्ण केल्या. मुंबईच्या डावाच्या अखेरच्या ओव्हरमध्ये अखेरच्या बॉलवर षटकार खेचत सूर्यकुमारनं शतक पूर्ण केलं. सूर्यकुमार यादवच्या १०३ धावांच्या जोरावर मुंबईनं २१८ धावा केल्या होत्या.यादवनं त्याच्या इनिंग्जमध्ये ११ चौकार आणि ६ सिक्सर लगावले. सूर्यानं मुंबईच्या दोन खेळाडूंसोबत ५० धावांची भागिदारी केली. विष्णू विनोदसोबत ४२ बॉलमध्ये ६२ धावांची भागिदारी सूर्यकुमारनं केली.**

### अक्षरने 21 धावा केल्या

**मुंबई आणि राजस्थान यांचे समान १२ गुण होते, पण राजस्थानचा नेट रनरेट हा मुंबईपेक्षा चांगला होता. त्यामुळे ते तिसऱ्या स्थानावर पोहोचले होते आणि मुंबईची चौथ्या स्थानावर घसरण झाली होती. पण मुंबईने या गोष्टीचा बदल या सामन्यात घेतला. मुंबईने गुजरातला पराभूत केले आणि त्यांनी दोन गुणांची कमाई केली. त्यामुळे मुंबईच्या संघाचे आता १४ गुण झाले आहेत. मुंबईच्या संघाने १४ गुणांसह गुणतालिकेत गमावलेले तिसरे स्थान पुन्हा पटकावले आहे आणि ही मुंबईच्या चाहत्यांसाठी आनंदाची बातमी असेल.**

---

## राशिद खान चमकला पण 'सूर्या' तळपला!



। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

आयपीएल २०२३ चा ५७ वा सामना मुंबई इंडियन्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात वानखेडे मैदानावर रंगला. गुजरातने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर मैदानात उतरलेल्या मुंबई इंडियन्सच्या फलंदाजांनी गुजरातच्या गोलंदाजांचा धुव्वा उडवला. मुंबईचा धडाकेबाज फलंदाज सूर्यकुमार यादवने पुन्हा एकदा वादळी खेळी केली. सूर्यकुमारने ४९ चेंडूत ११ चौकार आणि ६ षटकार ठोकून १०३ धावांची नाबाद खेळी करून आयपीएलमधील पहिलं शतक ठोकलं. या धावांच्या जोरावर मुंबईने गुजरातला २१९ धावांचं आव्हान दिलं होतं. परंतु, विजयासाठी २१९ धावांचा पाठलाग करणाऱ्या गुजरात टायटन्सच्या फलंदाजांची दाणादाण उडाली.

मुंबईच्या गोलंदाजांनी भेदक मारा करून गुजरातचा फलंदाजांना स्वस्तात माघारी पाठवलं. त्यामुळे गुजरातला २० षटकांत ८ विकेट्स गमावत १९१ धावा केल्या. राशिद खानने अप्रतिम फलंदाजी करत ३२ चेंडूत १० षटकार आणि ३ चौकारांच्या मदतीनं ७९ धावांची नाबाद खेळी केली. परंतु, राशिदला गुजरातला विजय मिळवून देता आलं नाही.

## रोहित शर्मामुळे मुंबई इंडियन्सची चिंता वाढली

### मुंबई इंडियन्सचा संघ हा सध्याच्या घडीला चांगल्या फॉर्मात

। कोलकाता ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**सामना सुरु होण्यापूर्वीच आता मुंबई इंडियन्सची चिंता वाढली आहे. मुंबईचं हे टेंशन वाढवले आहे ते कर्णधार रोहित शर्मामुळे. कारण रोहित आता असा एक निर्णय घेऊ शकतो, जेणेकरून मुंबई इंडियन्सचे टेंशन आता चांगले वाढू शकते.**

मुंबई इंडियन्सचा संघ हा सध्याच्या घडीला चांगल्या फॉर्मात आहे. गेल्या सामन्यात मुंबईने आरसीबीवर दणदणीत विजय मिळवला होता. त्यावेळी सूर्यकुमार यादवने धडाकेबाज खेळी साकारली होती. त्यामुळे मुंबईचा संघ हा गुणतालिकेत तिसऱ्या स्थानावर विराजमान झाला होता. पण राजस्थानच्या विजयानंतर मात्र मुंबईचा संघ हा चौथ्या स्थानावर आला आहे. पण जर मुंबईने गुजरातविरुद्धचा सामना जिंकला तर त्यांना प्ले ऑफच्या दिशेने मार्गक्रमण करता येईल. पण त्यामध्येच आता रोहित शर्मामुळे मुंबई इंडियन्सचे टेंशन वाढले आहे.

रोहितकडून सध्याच्या घडीला चांगली कामगिरी झालेली नाही. आयपीएल आता अखेरच्या टप्प्यात आले आहे, पण तरीही रोहितची एकही खेळी चाहत्यांना आठवणार नाही. दुसरीकडे मुंबईचा संघ हा चांगली कामगिरी करत आहे. पण रोहितची कामगिरी मात्र चांगली होताना दिसत नाही. रोहितने फॉर्मात येण्यासाठी सलामीचे स्थानही सोडले होते. रोहित तिसऱ्या स्थानावरही फलंदाजीला आला होता. पण त्यावेळी तो शून्यावर बाद झाला होता. त्यामुळे तो प्रयोग करणे रोहितने सोडले. पण अजूनही रोहितकडून जास्त धावा होत असल्याचे पाहायला मिळत नाही. त्यामुळे रोहितला आता आत्मचिंतनाही गरज आहे, असे म्हटले जात आहे. कारण रोहितचा फॉर्म असाच राहिला आणि संघ जर प्ले ऑफमध्ये गेला व रोहित फॉर्मात नसेल तर ते मुंबईसाठी धोकादायक ठरू शकते. यासाठी रोहित शर्मा आता एक ब्रेक घेऊ शकतो, अशी माहिती मिळत आहे. रोहितच्या अनुपस्थितीत सूर्यकुमार यादवकडे संघाचे नेतृत्व सोपवण्यात येऊ शकते. पण रोहित हा मुंबई इंडियन्सचा ब्रँड आहे आणि तो जर खेळला नाही तर मुंबई इंडियन्सला धक्का बसू शकतो. त्यामुळे रोहितने जर ब्रेक घेण्याचे ठरवले तर मुंबई इंडियन्सची चिंता वाढू शकते. रोहित शर्मा गुजरातच्या सामन्याआधी ब्रेक घेणार, असे म्हटले जात होते.



### आयपीएलपूर्वीही खेळाडूंना ब्रेक द्यायला हवा

**मुंबईचे टेंशन अजूनच वाढले आहे. पण रोहित गुजरातच्या सामन्यासाठी ब्रेक घेणार का हे टॉसच्या वेळीच समजू शकेल. कारण टॉस करायला जर रोहित आला तर तो खेळणार हे स्पष्ट होणार आहे. मुंबईत सामना जिंकला आणि बंगळुरुत फटाके फुटले; स्वतःसाठी जमलं नाही ते आरसीबीसाठी केलं. रोहित शर्माने आयपीएलपूर्वीही खेळाडूंना ब्रेक द्यायला हवा, असे वक्तव्य केले होते.**